# ख्रिस्ती स्वप्नांचा अर्थ सांगण्याची तत्वे

## स्वप्न आणि दृष्टान्ताची व्याख्या :

१. स्वप्न - ''झोपलेल्या व्यक्तीच्या मनामध्ये उमटणारी प्रतिमा, चित्रे इ. ची मालिका'' ***(वेबस्टर्स डिक्शनरी)***

२. दृष्टान्त - ''मानसिक प्रतिमा'' ***(वेबस्टर्स डिक्शनरी)***

३. *''स्वप्नस्थितीत, रात्रीच्या दृष्टान्तात...''* (ईयोब ३३ः१५)

इब्री लोक स्वप्न आणि दृष्टान्त यांमध्ये कशी घनिष्ट सांगड घालत होते हे या वचनावरून तुमच्या लक्षात येईल. येथे हे शब्द जवळजवळ समान अर्थाने वापरले आहेत.

स्वप्ने आणि दृष्टान्त या दोहोंमध्ये मनाच्या पडद्यावर चित्रे पाहण्याचा समावेश होतो. झोपलेल्या स्थितीत असताना ही चित्रांची मालिकी डोळ्यांसमोरून जाणे म्हणजे स्वप्न आणि जागे असताना ही दृष्ये दिसणे म्हणजे दृष्टान्त असे आपण सर्वसाधारणपणे म्हणू शकतो.

४. दिवास्वप्न पाहत असताना मनुष्य दृष्टान्ताच्या प्रक्रियेचा उपयोग करतो. याला उत्तेजन दिलेले नाही, आणि उपदेशक ५ः७ मध्ये बहुधा याचाच उल्लेख केला असावा. आपल्या अंतःकरणाचे डोळे देवाला सादर करणे आणि देवाने ते स्वप्ने, दृष्टान्त आणि दैवी कल्पनांनी भरावे म्हणून त्याला विनंती करणे चांगले आहे.

## स्वप्नांसंबंधी काही वैज्ञानिक निरीक्षणे

झोपेविषयी संशोधन करणाऱ्या प्रयोगशाळांनी सिद्ध केले आहे की, प्रत्येक व्यक्ती रोज रात्री झोपल्यानंतर ठराविक वेळी स्वप्न पाहते. झोपेच्या या वेळेला अल्फा पातळी (प्रारंभिक पातळी) असे म्हटले जाते. ही हलकी झोप असते. झोपेचे ९० मिनिटांच्या प्रत्येक चक्राची सुरुवात प्रारंभिक पातळीने (अल्फा लेवल) सुरू होते, मग थोडीशी गाढ झोप लागते, या पातळीला थिटा म्हणतात, आणि सरतेशेवटी गाढ झोप लागते. या गाढ झोपेला डेल्टा असे म्हणतात.

रोज रात्री ९० मिनिटांच्या पहिल्या चक्रानंतर मनुष्य अल्फा लेवलच्या झोपेकडे येतो, हा स्वप्नांचा छोटासा, पाच मिनिटांचा काल असतो. पुढच्या नव्वद मिनिटांच्या चक्रानंतरच्या अल्फा झोपेमध्ये हा अवधी दहा मिनिटांचा असतो. तिसऱ्यांदा अल्फामध्ये गेल्यानंतर हा अवधी १५ मिनिटांचा असतो. अशा प्रकारे हा अवधी वाढत जातो. एखादी व्यक्ती पूर्ण आठ तास झोपली, तर अखेरचा एक तास हा पूर्णपणे अल्फा प्रकारच्या झोपेचा वेळ असतो. अशा प्रकारे आठ तास झोपणारी सर्वसाधारण व्यक्ती या काळात एक ते दोन तास स्वप्ने पाहत असते.

अल्फा पातळीवरच्या झोपेमध्ये मनुष्याच्या डोळ्यांची वेगाने हालचाल होते. तो स्वप्नामध्ये येणारी दृष्ये अक्षरशः पाहत असतो, म्हणून त्याचे डोळे दृष्यांच्या हालचालीनुसार मागेपुढे होतात. अल्फा पातळीवरच्या झोपेमध्ये डोळ्यांची अशी झपाट्याने उघडझाप किंवा हालचाल होते, त्यावरून ती व्यक्ती स्वप्न पाहत आहे की नाही आणि रात्रीत सर्वसाधारपणे किती वेळ स्वप्न पाहण्यात गेला याचा अनुमान झोपेविषयी संशोधन करणाऱ्या प्रयोगशाळा काढतात.

झोपेत असताना एखाद्या मनुष्याच्या डोळ्यांची अशी झपाट्याने उघडझाप सुरू झाल्यावर सुमारे तीन रात्री त्याला स्वप्न पाहू न देता उठवले, तर त्याचे मानसिक संतुलन बिघडते असे संशोधकांच्या लक्षात आले आहे. म्हणजेच आपले मानसिक आणि भावनिक संतुलन राखण्यामध्ये स्वप्ने महत्त्वाची भूमिका निभावतात हे यावरून स्पष्ट होते. स्वप्ने ही आपल्या मानसिक आणि भावनिक आरोग्याचे रक्षक आहेत असे म्हटले जाते.

## आपल्या स्वप्नांचे आपण का ऐकावे याची सात कारणे

१. जुन्या करारामध्ये देवाने जाहीर केले की तो स्वप्ने आणि दृष्टान्त यांच्याद्वारे बोलेल.

*परमेश्वर त्यांना म्हणाला, ''माझे शब्द ऐका.*

*तुमच्यामध्ये कोणी संदेष्टा असला तर मी त्याला दृष्टांतात प्रगट होत असतो आणि स्वप्नात त्याच्याशी भाषण करीत असतो''* (गणना १२:६).

२. देवाने जाहीर केले की जुन्या करारात तो स्वप्ने आणि दृष्टांत यांच्याद्वारे बोलला.

*''मी संदेष्ट्यांबरोबर बोललो आहे; मीच दिव्य दर्शनांची रेलचेल केली आहे आणि संदेष्ट्यांच्या द्वारे मी दृष्टांत देऊन बोध केला आहे''* (होशेय १२:१०).

३. मी स्वप्ने आणि दृष्टांत यांच्याद्वारे बोलेन असे देवाने नवीन करारात सांगितले आहे.

*''देव म्हणतो, शेवटल्या दिवसांत असे होईल की, मी मनुष्यमात्रावर आपल्या आत्म्याचा वर्षाव करीन; तेव्हा तुमचे पुत्र व तुमच्या कन्या संदेश देतील. तुमच्या तरुणांस दृष्टांत होतील, व तुमच्या वृद्धांस स्वप्ने पडतील''* (प्रे.कृ.२:१७).

४. रात्रीच्या वेळी स्वप्नांच्या द्वारे मी तुम्हांला बोध करीन असे देवाने सांगितले आहे.

*''परमेश्वराने मला बोध केला आहे. त्याचा मी धन्यवाद करतो, माझे अंतर्यामहि मला रात्री शिक्षण देते.''* (स्तोत्र.१७:६).

५. आम्हांला पडणारी स्वप्ने ही दैववादी किंवा प्रारब्धवादी नाहीत, तर आमचा नाश होऊ नये, म्हणून आमचे परिवर्तन व्हायला हवे हे ती सांगतात.

*देव एका प्रकारे नव्हे तर दोन प्रकारे मनुष्याशी बोलतो; पण त्याकडे चित्त देत नाही. स्वप्नस्थितीत, रात्रीच्या दृष्टांतात, मनुष्य गाढ निद्रेत असता, तो बिछान्यावर पडून झोप घेत असता, देव त्याचे कान उघडितो; त्यास प्राप्त झालेल्या बोधावर तो मुद्रा करितो. तेणेकरून तो मनुष्याच्या कृतीला आळा घालितो, पुरुषाच्या गर्वाचा परिहार करितो; तो त्याचा जीव गर्तेपासून रक्षितो. शस्त्राने होणाऱ्या* ***नाशापासून त्याचा जीव बचावितो*** (ईयोब ३३:१-१८, ठळक टाईप माझा).

६. स्वप्नांमध्ये देव फार लक्षणीय गोष्टी करतो. उदा. अब्राहामासोबतचा करार त्याने स्वप्नात स्थापन केला.

*सूर्यास्ताच्या सुमारास अब्रामास* ***गाढ निद्रा*** *लागली तेव्हा घोर भीति, निबिड अंधकार त्याच्यावर पडला. परमेश्वर अब्रामास म्हणाला, तू निश्चितपणे समज की जो देश स्वतःचा नाही अशा देशात तुझे संतान उपरी होऊन राहील व तेथल्या लोकांचे दास्य करील, आणि ते लोक चारशे वर्षे त्यांना छळितील... त्या दिवशी परमेश्वराने अब्रामाशी* **करार करून** *सांगितले, मिसराच्या नदीपासून ते महानदी फरात येथपर्यंतचा प्रदेश मी तुझ्या संतानास देतो* (उत्पत्ती १५:१२,१३,१८, ठळक टाईप माझा).

७. स्वप्नांद्वारे देव अलौकिक दाने, देणग्या देतो.

*गिबोन येथे परमेश्वराने रात्री स्वप्नात शलमोनास दर्शन दिले; देवाने त्यास म्हटले, ''तुला पाहिजे तो वर माग, तो मी तुला देईन...''*

*''यास्तव आपल्या सेवकास तुझ्या लोकांचा न्याय करण्यास सावधान चित्त दे म्हणजे मला बऱ्यावाइटाचा विवेक करिता येईल. एवढ्या मोठ्या प्रजेचा न्याय करण्यास कोण समर्थ आहे?''*

*''...म्हणून मी तुझ्या म्हणण्याप्रमाणे करितो; मी तुला बुद्धिमान व विवेकी चित्त देतो; तुझ्यासारखा पूर्वी कोणी झाला नाही व पुढे होणार नाही...'' शलमोन जागा झाला तेव्हा आपणांस स्वप्न पडले असे त्यास समजल* (१ राजे ३:५,९,१२,१५).

## आपल्या स्वप्नांचे महत्त्व किती आहे याचा थोडक्यात सारांश

स्वप्नांद्वारे मनुष्यांशी बोलण्याची निवड देवाने केली आहे. आमच्या स्वप्नांद्वारे तो आम्हांला मार्गदर्शन करतो आणि बोध करतो. आमच्या स्वप्नांद्वारे तो आमच्याशी करार स्थापित करतो. आमच्या स्वप्नांत तो आम्हांला दाने देतो. उत्पत्तीपासून प्रगटीकरणापर्यंत त्याने स्वप्नांचा उपयोग केला आहे, आणि अखेरच्या दिवसांत तो त्यांचा वापर सुरू ठेवणार आहे असे त्याने जाहीर केले आहे. पवित्र शास्त्रातील सर्व स्वप्ने आणि दृष्टान्त यांची, आणि त्या स्वप्नांमुळे व दृष्टान्तांमुळे घडलेल्या सर्व गोष्टी आणि कृतींची गोळाबेरीज केली, तर पवित्र शास्त्राचा सुमारे एक तृतीयांश भाग बनतो. नव्या कराराच्या आकाराइतका हा भाग होतो. स्वप्ने हा

आमच्याशी संवाद साधण्यासाठी देवाने निवडलेला मुख्य मार्ग आहे, आणि म्हणून त्यांना खूप महत्त्व दिले पाहिजे!

## तुमची स्वप्ने पुन्हा आठवण्यासाठी सहाय्यक ठरणाऱ्या पाच गोष्टी

१. तुम्ही स्वतःशी म्हणता, ''स्वप्नांमध्ये योग्य तो संदेश असतो असा माझा विश्वास आहे.''

स्वप्ने तुम्ही गंभीरपणे घेत आहात आणि ती तुम्हांला काय सांगतात ते ऐकायला उत्सुक आहात हे तुम्ही तुमच्या अंतःकरणाला सांगत आहात. तुम्ही स्वप्नांना परवानगी देत आहात, आणि प्रत्येक स्वप्नानंतर तुम्हांला जागे करायला त्यांना सांगत आहात. तुमचे अंतःकरण अगदी असेच करील. स्वप्न संपल्यावर पाच मिनिटाच्या आत तुम्ही जर जागे झाला नाही, तर तुम्हांला स्वप्न आठवणार नाही. पण तुम्ही जर तुमच्या अंतःकरणाला सांगाल की, स्वप्ने ही न पचलेले अन्न आहे, तर स्वप्न संपल्यावर तुमचे अंतःकरण तुम्हांला जागे करणार नाही, परिणामी तुम्हांला ते स्वप्न आठवणार नाही.

२. तुम्ही झोपी गेल्यावर देवाने स्वप्नांद्वारे तुमच्याशी बोलावे म्हणून त्याला विनंती करा.

देव प्रार्थनांची - विशेषतः त्याच्या इच्छेनुसार केलेल्या प्रार्थनांची उत्तरे देतो.

३. तुमची वही तुमच्या बिछान्याजवळ ठेवा आणि जागे झाल्यावर तुमचे स्वप्न तिच्यात लिहा.

सकाळ होईपर्यंत तुम्ही बरेचसे स्वप्न विसरून जाल, म्हणून जागे झाल्याबरोबर उठून वहीत ते लिहून काढा.

४. आठ तास झोपा, कारण शेवटचा पूर्ण तास हो स्वप्नांचा काळ असतो.

५. तुम्हांला जाग येईल तेव्हा उठा. अलार्मचा उपयोग करू नका, कारण त्यामुळे स्वप्ने अर्धवट राहतात, आणि त्यांचे विस्मरण होते.

वरील पाच गोष्टी तुम्ही केल्या तर दर आठवड्यात तुम्ही स्वप्ने आठवू शकाल.

## स्वप्नांचा अर्थ सांगण्याची सात मूलभूत तत्त्वे

१. पुष्कळशी स्वप्ने (पवित्र शास्त्रातील स्वप्नेसुद्धा) ही लाक्षणिक आहेत, म्हणून एखादे राजकीय व्यंगचित्र तुम्ही जसे पाहात तसेच त्या स्वप्नांकडे पाहा. ''या स्वप्नाकडे लाक्षणिक अर्थाने पाहा,'' अशी सूचना तुम्ही तुमच्या मेंदूला द्या.

''पिक्शनरी'' किंवा ''बायबल पिक्शनरी'' नावाचा एक खेळ मिळतो, तो खेळल्यामुळे लाक्षणिक अर्थाने बोलण्याची, संवाद साधण्याची कला तुम्ही शिकू शकाल.

२. ही चिन्हे स्वप्न पाहणाऱ्याच्या जीवनाशी संबंधित असतील, म्हणून विचारा, ''या लक्षणाचा किंवा चिन्हाचा माझ्या दृष्टीने काय अर्थ आहे?'' किंवा तुम्ही दुसऱ्या व्यक्तीच्या स्वप्नांचा अर्थ सांगत असाल तर, ''या चिन्हाचा तुमच्या दृष्टीने काय अर्थ होतो?'' असे त्याला विचारा.

उदा. योसेफ मेंढपाळ होता, आणि त्याला पेंढ्या, सूर्य, चंद्र आणि तारे वंदन करतात असे स्वप्न पडले (उत्पत्ती ३७:१-११). कुरणात राहणाऱ्या मेंढपाळाच्या मुलाच्या जीवनात या गोष्टी किंवा प्रतिमा असतात. नबुखद्नेस्सर राजा होता, त्याला सोन्याच्या पुतळ्याचे स्वप्न पडले, (दानीएल २:३) आणि राजवाड्यांत सोने मुबलक असते.

३. सद्यस्थितीत तुम्ही ज्या समस्यांचा, प्रश्नांचा सामना करीत आहात त्यांविषयी स्वप्ने सर्वसाधारणपणे बोलत असतात. म्हणून विचारा, ''मला हे स्वप्न पडण्याच्या आदल्या दिवशी मी कोणत्या गोष्टीचा विचार करीत होतो?''

उदा., मिशनरी दौऱ्यात आता कुठे जावे असे विचार पौल करीत होता, तेव्हा मासेदोनियातील मनुष्य त्याला आपल्याकडे बोलावत असल्याचे स्वप्न पडले (प्रे.कृ.१६:६-११). आपले राज्य सर्वकाळ राहील असे नबुखद्नेस्सराला वाटत होते (दानीएल ४:२८-३३), आणि झाड मुळापासून टाकण्यात आल्याचे स्वप्न त्याला पडले (दानीएल ४:९-२७). स्वप्न पाहणारा झोपी गेला तेव्हा त्याच्या मनात कोणते विचार

होते हे तुम्हांला समजले की, त्याच्या स्वप्नाचा अर्थ सांगणे अधिक सोपे होते.

४. स्वप्नाचा अर्थ स्वप्न पाहणाऱ्याकडून काढून घेतला पाहिजे. त्याला पडलेल्या स्वप्नाविषयी तुम्हांला काही कल्पना नाही हे लक्षात घ्या, पण पवित्र आत्म्यावर विसंबून राहून आणि ज्याला स्वप्न पडले आहे त्याला कौशल्याने प्रश्न विचारून तुम्ही स्वप्नाचा अर्थ समजून घेऊ शकता.

*या चौघा तरुणांस देवाने सर्व विद्या व ज्ञान यांत निपुण केले; दानीएल हा सर्व दृष्टांत व स्वप्ने यांचा उलगडा करण्यात तरबेज झाला (दानीएल १:१७).*

*मनुष्याच्या मनातील मसलत खोल पाण्यासारखी असते, तरी समजंस ती बाहेर काढितो* (नीती.२०:५).

५. स्वप्न सांगणाऱ्याला त्याच्या स्वप्नाचा योग्य अर्थ सांगितल्यावर त्याचे अंतःकरण त्याच्याशी सहमत होईल, आणि ''अगदी बरोबर,'' अशी साक्ष देईल, म्हणून स्वप्न पाहणाऱ्याचे मन ज्या अर्थाशी सहमत होत नाही, असा अर्थ कदापि स्वीकारू नका.

६. स्वप्ने प्रगट करतात, पण दोष देत नाहीत. जीवनाचा नाश करणे नव्हे, तर रक्षण करणे हे त्यांचे उद्दिष्ट असते (ईयोब ३३:१३-१८).

७. जोपर्यंत देव दुसऱ्या मार्गांनी आपल्याशी बोलत नाही, आणि खात्री देत नाही (अंतःकरणात शांती, इतरांचा सल्ला, एखादे शास्त्रवचन, देवाची शांत, मंद वाणी, भविष्यसंदेश, इ.), तोपर्यंत केवळ स्वप्नांच्या आधारे तुमच्या जीवनाविषयी महत्त्वाचे निर्णय घेऊ नका.

## तुमच्या स्वत:विषयीची स्वप्ने समजून घेणे

किमान ९५% स्वप्ने ही तुमच्या स्वतःविषयी असतील - तुमची आंतरिक स्थिती, तुमची सध्याची परिस्थिती, तुमचे नातेसंबंध. **तुमची स्वप्ने तुमच्या अंतःकरणापासून** येतात, आणि तुम्हांला महत्त्वाच्या वाटणाऱ्या गोष्टी व्यक्त करतील. तुमचा आत्मा साधारणपणे तुमची भावनिक स्थिती, अंतःकरणातील झगडे आणि पवित्रीकरणाचे मुद्दे या गोष्टी लाक्षणिक रूपाने प्रगट करील. तुमचे शरीर आणि आरोग्य हेही विषय तुमच्या आत्म्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत, म्हणून तेही लाक्षणिक अर्थाने प्रगट केले जातील. इतर लोकांसोबत असलेले तुमचे नातेसंबंधही तुमच्या अंतःकरणाच्या दृष्टीने महत्त्वाचे असतात, म्हणून चिन्हे आणि रूपकांच्या (लाक्षणिक) द्वारे प्रगट केले जातील. तसेच तुमच्या जीवनातील घडामोडी, परिस्थिती, सेवा किंवा व्यवसाय हे तुमच्या जीवनाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत, म्हणून तुमच्या स्वप्नांमध्ये हेही लाक्षणिक अर्थाने दिसतील.

बहुतांश स्वप्ने ही तुमच्या स्वतःविषयी, तुमच्या आंतरिक मनुष्याविषयी असल्यामुळे, तुमचे स्वप्न सध्या तुम्ही तुमच्या जीवनात कोणत्या गोष्टींचा सामना करीत आहात त्याविषयी सांगत असावे असे गृहीत धरून त्याचा अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न करावा.

*स्वप्नाची **भावना** प्रथम दूर करा.* स्वप्न पडल्यानंतर जागे झाल्यावर तुम्हांला कसे वाटले? तुमचे अंतःकरण भीतीने धडधडत होते का? तुम्ही गोंधळलेले, निराश होता का? तुम्हांला राग आला होता का? तुम्हांला नाकारल्यासारखे किंवा धमकावल्यासारखे वाटत होते का? स्वप्नामुळे तुमच्या मनात सर्वसाधारणपणे कोणत्या भावना निर्माण झाल्या? तुमच्या जीवनाच्या कोणत्या बाबतीत याच भावना आहेत? लगेचच हे तुमच्या लक्षात आले नाही, तर प्रभूने तुम्हांला ते प्रगट करावे म्हणून त्याला विनंती करा.

*नंतर स्वप्नातील/स्वप्नाच्या कृतीचा विचार करा.* या कृतीचा अर्थ काय हे पवित्र आत्म्याने प्रगट करावे म्हणून त्याला विनंती करा. उदा. जर स्वप्नात तुमची गाडी मागे जात असेल, तर ''जीवनातील कोणत्या क्षेत्रात मी मागे जात आहे, घसरत आहे, कोणत्या क्षेत्रात प्रगती करीत नाही हे कृपा करून मला दाखव,'' अशी विनंती करा. स्वप्नात तुमची गाडी दुसरा कोणी चालवत असेल तर, ''हा मनुष्य सध्या कोणत्या बाबतीत (माझ्या प्रतिक्रिया, दृष्टीकोन, वागणूक) माझ्या जीवनाचे नियंत्रण करीत आहे हे दाखव'' असे विचारा. तुम्ही पडत असाल, तर ''जीवनात माझे पतन कसे होत आहे?'' किंवा ''माझ्या जीवनाचे नियंत्रण सुटत आहे?'' असे विचारा. तुम्ही जर भरारी घेत असाल, तर ''माझ्या जीवनातील कोणत्या क्षेत्रात मी भरारी घेत आहे? माझ्या जीवनातील कोणत्या समस्यांवर मी विजयी होत आहे?'' असे विचारा. तुमचा पाठलाग होत असेल, तर

‘‘माझा पाठलाग होत आहे, लोक माझ्या पाठीमागे लागले आहेत, असे मला का वाटते?’’ असे विचारा. स्वप्नात तुम्ही मरत असाल, तर तुमच्या जीवनातील कोणती गोष्ट मृत्यूपंथास लागली आहे ते विचारा. (कदाचित ही चांगली गोष्ट असेल, कारण तुम्ही गर्वाला, ‘स्व’ला मरत असाल).

तुमच्या स्वप्नातील स्वप्नांचा अर्थ लाक्षणिक अर्थाने समजून घ्यायचा आहे हे लक्षात ठेवा. तुम्ही मरणार आहात हे तुमच्या स्वप्नाला तुम्हांला खऱ्या अर्थाने दाखवायचे असेल, तर ती घटना ते लाक्षणिक रीतीने दाखवील. उदा. राष्ट्राध्यक्ष लिंकन यांची हत्या होण्याच्या काही दिवस अगोदर त्यांना शवपेटीचे स्वप्न पडले होते.

तुमच्या स्वप्नातील भावना आणि कृती यांचा उपयोग तुम्ही तुमच्या जीवनातील पैलूंचा अर्थबोध करून घेण्यासाठी केला, तर तुमच्या स्वप्नातील बाकीची चिन्हे समजून घेणे अधिक सोपे होईल.

*तुमच्या स्वप्नातील* ***लोक*** *तुमच्या स्वभावगुणांचे दर्शक असतात.* तुमच्या स्वप्नात येणारी व्यक्ती तुमच्या कोणत्या स्वभाववैशिष्ट्याचे दर्शक आहे हे ‘‘या व्यक्तीच्या जीवनाचे महत्त्वाचे स्वभाववैशिष्ट्य काय आहे?’’ असा प्रश्न स्वतःला विचारण्याद्वारे तुम्ही समजून घेऊ शकता. तुमच्या स्वतःच्या कोणत्या बाबीविषयी तुम्ही स्वप्न पाहत आहात हे या प्रश्नाच्या उत्तरावरून तुमच्या लक्षात येईल. उदा. तुमच्यामध्ये दडलेला उद्योगपती, आदरातिथ्य करणारा यजमान, व्यवस्थापक, दर्जेदार विदूषक, आध्यात्मिक पुढारी, पापात पडलेली व्यक्ती, कामाशिवाय दुसरे काही न सुचणारी व्यक्ती इ. दाखवावा असे तुमच्या अंतःकरणाला वाटत असेल, तर अशी एखादी व्यक्ती तुमच्या स्वप्नात येईल. तुमचे पाळक तुमच्यामधील आध्यात्मिक व्यक्तीचे दर्शक असतील; अध्यक्ष किंवा राजा तुमच्यातील नेतृत्वगुण दाखवील, एखादा पोलीस, न्यायाधीश किंवा हुकुमशहा तुमचा अधिकार दर्शवील; गणवेषातील व्यक्ती (नर्स, वेटर्स) तुमच्या सुप्त इच्छा दाखवील.

स्वप्नातील व्यक्तीच्या नावावरून सुद्धा एखादी गोष्ट तुमच्या लक्षात आणून देण्याचा प्रयत्न स्वप्नाद्वारे केला जात असेल. करुणा, जॉय, ग्रेस, ज्योशुआ किंवा डेव्हिड अशा नावाच्या व्यक्ती स्वप्नात आल्या असतील, तर त्या त्या व्यक्तीच्या नावाच्या अर्थावरून जे गुण प्रकट होतात त्या गुणांकडे तुमचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न तुमचे अंतःकरण करीत असेल. किंवा ते नावच एखादा संदेश असू शकेल. उदा. एका व्यक्तीने सांगितले की, ‘‘अनिता कूक’’ नावाच्या मैत्रिणीचे स्वप्न तिला पडले, आणि ‘‘मी स्वयंपाक करण्याची गरज आहे’’ असा त्याचा अर्थ होता. (इंग्रजीतील Cook या शब्दाचा अर्थ स्वयंपाक करणे असा होतो.)

तसेच स्वतः प्रभू किंवा त्याचा एखादा देवदूत तुम्हांला स्वप्नात भेटण्याची शक्यता आहे.

***प्राणी हे*** *बहुतेक वेळा तुमच्या भावनांचे दर्शक असतात.* ‘‘हा प्राणी माझ्या कोणत्या भावना व्यक्त करीत असेल?’’ असा प्रश्न स्वतःला विचारा. तुम्ही जेथे राहता ते भौगोलिक ठिकाण, तुमचा वैयक्तिक अनुभव, पवित्र शास्त्राचे तुम्हांला असलेले ज्ञान आणि तुमची संस्कृती यांवर ते अवलंबून असेल. उदा. बैल हा रागाचे दर्शक असेल (‘‘रागावलेला बैल), कोल्हा हा धूर्तपणाचे लक्षण असेल; मांजर चौकसबुद्धीचे, जिज्ञासेचे दर्शक असेल, कबुतर शांतीचे; गरुड स्वातंत्र्याचे; साप हुशारीचे; सिंह राजाचे, शाही इतमामाचे दर्शक असेल. ख्रिस्त (‘‘यहूदा वंशाचा सिहं’’) आणि सैतान (‘‘कोणाला गिळावे हे शोधीत फिरणारा सिंह’’) या दोघांचाही दर्शक, प्रतीक म्हणून सिंहाचा उपयोग पवित्र शास्त्रात केलेला आहे हे लक्षात ठेवा. म्हणून तुमच्या स्वप्नात आलेल्या प्राण्यावरून निश्‍चित काय प्रगट केले जाते, सांगितले जाते हे समजून घेण्यासाठी तुम्ही पवित्र आत्म्यावर अवलंबून राहिले पाहिजे.

स्वप्नामध्ये तुमच्या भावनांचे प्रदर्शन करणाऱ्या प्राण्यापासून पळून न जाता तुम्ही त्याचा मुकाबला केला, तर त्या प्राण्याने दुसरेच रूप घेतल्याचे कदाचित तुम्हांला पाहायला मिळेल. तुमच्या भावनांचा मुकाबला करणे चांगले आहे.

*स्वप्नातील* ***अंक*** *किंवा* ***आकडे*** *हे तुमच्या वास्तविक जीवनातील अंकांचे दर्शक असतात.* असे असले तरी हे आकडे दुसऱ्या कशाशी तरी जोडलेले असतील, आणि या संबंधित गोष्टींचा लाक्षणिक अर्थ समजून घेण्याची गरज असते. उदा. योसेफाने अकरा ताऱ्यांचे स्वप्न पाहिले तेव्हा अकरा हा आकडा वास्तविक होता, पण तारे मात्र लाक्षणिक होते. ते त्याच्या भावांचे दर्शक होते. योसेफ त्याच्या अकरा भावांविषयी स्वप्न पाहत होता (उत्पत्ती ३७ः१-११). तसेच प्यालेबरदाराला पडलेल्या स्वप्नातील फांद्या या तीन दिवसांचे

दर्शक होत्या (उत्पत्ती ४०:१२), आणि आचाऱ्याला पडलेल्या स्वप्नातील तीन टोपल्या या तीन दिवसांचे दर्शक होत्या (उत्पत्ती ४०:१८). फारोच्या स्वप्नातील सात गाई या सात वर्षे होत्या (उत्पत्ती ४१:२६). म्हणून संबंधित आकड्याद्वारे निश्चित अर्थबोध होण्याची अपेक्षा धरा. त्याचा अर्थ काय ते समजून घेण्यासाठी प्रार्थना, मर्गग्राही विवेचन आणि पवित्र आत्म्याकडून प्रगटीकरणाची (तुमच्या अंतःकरणात तुम्हांला याची खात्री पटेल) गरज लागेल.

तुमच्या स्वप्नाचा अर्थ निश्चितपणे समजल्याची खात्री तुमच्या अंतःकरणात पटेपर्यंत त्याविषयी विचार करीत राहा. निरनिराळ्या लक्षणांचा अर्थ काय होतो ते शोधत राहा.

कधी कधी तुमच्या वैयक्तिक, आंतरिक जीवनाशी संबंधित नसलेले स्वप्न तुम्हांला पडेल. पवित्र आत्म्यावर पूर्णपणे विसंबून राहून तुम्ही त्या स्वप्नाचा अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न केला आणि स्वप्नातील रूपके तुम्हांला लागू पडत नाही असे तुमच्या लक्षात आले, तर तुमच्या आध्यात्मिक मार्गदर्शकांचे मार्गदर्शन घ्या. तुमचे अंतःकरण तुम्हांला काय संदेश देण्याचा प्रयत्न करीत आहे हे कदाचित त्यांना समजू शकेल.

तुम्हांला पडलेले स्वप्न तुमच्या आंतरिक जीवनाला लागू होत नाही असे तुमच्या मार्गदर्शकाला वाटत असेल, तर ते स्वप्न बहुधा दुसऱ्या कोणाविषयी तरी असावे असे तुम्ही म्हणू शकाल. हे स्वप्न तुमच्याविषयी नाही, तर दुसऱ्या कोणाविषयी तरी आहे याचे एक लक्षण म्हणजे स्वप्नात घडणाऱ्या कृत्यात तुमचा सहभाग नसतो तर तुम्ही केवळ प्रेक्षक असता.

हे तत्त्व स्पष्ट करणारी पवित्र शास्त्रातील काही उदाहरणे पुढे दिली आहेत :

उत्पत्ती १५:१-२१ स्वप्नात देव अब्राहामाशी बोलतो = स्वतःविषयी स्वप्न पाहतो.

उत्पत्ती २०:१-१८ स्वप्नात देव अबीमलेखाशी बोलतो. = स्वतःविषयी स्वप्न.

उत्पत्ती २८:१०-२२ स्वप्नात देव याकोबाशी बोलतो = स्वतःविषयी स्वप्न.

उत्पत्ती३१:१०-२९ याकोब आणि देवाचे संभाषण = स्वतःविषयी स्वप्न.

उत्पत्ती ७:१-११ योसेफ आणि त्याचे भाऊ = स्वतःविषयी स्वप्न.

उत्पत्ती ४०:१-२३ प्यालेबरदार आणि आचारी = स्वतःविषयी स्वप्न पाहतात.

उत्पत्ती ४१:१-४९ फारोला पडलेले ७ गाईंचे स्वप्न = इतरांविषयी स्वप्न पाहतो.

उत्पत्ती ४६:१-७ इस्राएलाचे देवाशी संभाषण = स्वतःविषयी स्वप्न पाहतो.

शास्ते ७:९-१८ भाकरीची तंबूला धडक = स्वतःविषयी स्वप्न

१ राजे ३:५-२८ देव आणि शलमोन यांचा संवाद = स्वतःविषयी स्वप्न

दानीएल २:१-४९ पुतळ्याला दगडाची धडक = इतरांविषयी स्वप्न

दानीएल ७:१-२८ चार प्राणी = इतरांविषयी स्वप्न

दानीएल ८:१-२७ मेंढा आणि एडका = इतरांविषयी स्वप्न

दानीएल १०:१-१२:१३ भीतीदायक स्वप्न = इतरांविषयी स्वप्न

मत्तय.२:३-१५ देव योसेफाशी बोलतो = स्वतःविषयी स्वप्न

मत्तय.२:१९-२३ देव योसेफाशी बोलतो = स्वतःविषयी स्वप्न

**सारांश** : स्वप्न पाहणाऱ्याविषयी (स्वतःविषयी) १३ स्वप्ने आणि इतरांविषयी ४ स्वप्ने.

पवित्र शास्त्रातील उदाहरणांवरून पुढील दोन महत्त्वाच्या गोष्टी लक्षात येतात :

१. दुसऱ्यांसाठी किंवा दुसऱ्यांविषयी असलेली स्वप्ने ही भविष्यात्मक होती आणि ती राजांना किंवा त्यांच्या सल्लागारांना पडली होती. त्यांच्या राज्याच्या भवितव्याविषयी ही स्वप्ने होती. यावरून असे म्हणता येईल की, आपल्याला जी स्वप्ने (आणि पवित्र आत्म्याकडून होणारे सर्व प्रकटीकरण) पडतात ती केवळ ज्यांची जबाबदारी आपल्यावर आहे, ज्यांच्याशी आपला संपर्क आहे त्यांच्याबाबत पडतात. ज्यांच्यावर आपला प्रभाव, अधिकार नाही; किंवा ज्यांना आपण जबाबदार नाही त्यांच्याविषयी आपल्याला स्वप्ने पडत नाहीत.

२. स्वतःविषयी पडणारी स्वप्ने ही **स्वप्न पाहणाऱ्याविषयी आणि त्याच्या संततीविषयी** असू शकतात. तसेच स्वप्नाचे प्रकटीकरण अशाच कोणाला तरी दिले नव्हते, तर अधिकार आणि प्रभाव असलेल्या व्यक्तीला दिले होते. मध्यस्थी करणाऱ्यांना इतरांविषयी स्वप्ने पडू शकतात, *जेणेकरून ते त्यांच्यासाठी प्रार्थना करू शकतील.*

हे तत्त्व लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे : *सर्व प्रकारच्या* स्वप्नांत शब्दशः अर्थ असणाऱ्या आणि लाक्षणिक अर्थ असणाऱ्या भाषेचे मिश्रण असू शकते.

स्वप्नांचा अर्थ सांगत असताना आपल्या भाषेतील अलंकार, रूपके काय आहेत हे समजून घ्या. स्वप्नात आगीचे दृष्य दिसले असेल तर तुम्ही ''आगीशी खेळत असल्याचा'' इशारा दिला जात असेल. एखादे गोठलेले तळे, हिमप्रवाह किंवा बर्फाचे तुकडे दिसले असतील तर एखाद्या गोष्टीचा केवळ थोडासा भाग तुम्हांला दिसत आहे असा अर्थ ध्वनित होत असेल. स्वप्नात तुमचा चश्मा फुटला असेल तर परिस्थिती तुम्हांला नीट समजली नाही असा अर्थ असू शकतो. अशा प्रकारे तुमच्या भाषेतील निरनिराळ्या वाक्प्रचारांवरून अर्थबोध होऊ शकतो.

तुमच्या स्वप्नातील संदेश तुम्हांला समजसाठी देव कृपाळू आणि महान आहे हे लक्षात ठेवा. वर सांगितल्यापेक्षा तुमच्या स्वप्नाचा अर्थ निराळा असेल तर तुमच्या अपेक्षेप्रमाणे तो स्वप्नात तुमची भेट घेईल.

## तुमच्या स्वतःविषयीच्या स्वप्नाचा अर्थ समजून घेण्याची सर्वांत सोपी पद्धत

स्वप्नाचा अर्थ समजून घेण्याची सर्वांत चांगली पद्धत म्हणजे स्वप्नातील पहिल्या चिन्हाचा, रुपकाचा अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न करणे. त्यानंतर क्रमाक्रमाने एकेका रुपकाचा अर्थ समजून घ्या. नेहमी पुढील प्रश्न विचारा, ''या वेळी या रुपकाचा किंवा चिन्हाचा माझ्या जीवनात कशा प्रकारे अनुभव येत आहे?''

* * *

## इतरांविषयी पडणारी स्वप्ने

आपल्याला पडणाऱ्या स्वप्नांपैकी सर्वसाधारणपणे केवळ ५% स्वप्ने ही दुसऱ्यांविषयी असतात. हे स्वप्न तुमच्याविषयी सांगत नसते, तर खऱ्याखुऱ्या बाह्य परिस्थितीविषयी सांगत असते. माझ्या हे लक्षात आले आहे की ज्यांचा उजवा मेंदू जास्त कार्यक्षम असतो, ते स्वतःपेक्षा इतरांविषयी स्वप्ने पाहू शकतात.

उदा. ***कम्युनियन विथ गॉड*** या पुस्तकातील ''ब्रेन प्रेफरन्स इंडिकेटर'' या चाचणीच्या वेळी ७.७ गुण मिळवलेल्या तीन निरनिराळ्या महिला मला माहीत आहेत. (आतापर्यंत मी पाहिलेला हे सर्वांत जास्त गुण आहेत). या स्त्रियांना इतरांविषयी अगदी स्पष्ट अशी स्वप्ने पडली, त्यात त्यांनी त्यांच्या समुदायांत त्या रात्री खून, बलात्कार, चोरी होत असल्याचे पाहिले आणि दुसऱ्या दिवसांच्या वर्तमानपत्रांमध्ये खरोखरच अशा अर्थाच्या बातम्या त्यांना वाचायला मिळाल्या. जीवनात खरोखर घडणाऱ्या घटना दाखवणारी ही स्वप्ने होती. अर्थात सर्वच स्वप्ने अशा भयानक गोष्टी दाखवतात असे नाही. मला व्यक्तिशः माहीत असलेली ही उदाहरणे मी केवळ माहितीदाखल दिली आहे.

स्वतःविषयी पडलेल्या स्वप्नांपेक्षा इतरांविषयी पडलेली स्वप्ने अधिक प्रमाणात सांगितली जातात, म्हणून पवित्र शास्त्रातील बहुताश स्वप्ने ही दुसऱ्यांविषयी पडलेल्या स्वप्नांच्या वर्गवारीतील आहेत.

## तुम्हांला पडलेले स्वप्न दुसऱ्या कोणाविषयी तरी आहे हे समजून घेण्यासाठी मार्गदर्शनपर सूचना

१. स्वप्नात घडलेल्या कृतीचे तुम्ही प्रेक्षक असता.

स्वप्नातील कृतीमध्ये तुम्ही जर सहभागी असाल, तर ते स्वप्न तुमच्यासाठी असण्याची शक्यता आहे. त्याउलट ती कृती तुम्ही केवळ प्रेक्षक म्हणून बघत असाल, तर ते स्वप्न दुसऱ्या व्यक्तीसाठी असण्याची शक्यता असते.

२. स्वप्न तुमच्या जीवनाशी जुळत नाही.

तुम्ही नेहमी देवाला विचारले पाहिजे, ''प्रभूदेवा, माझे अंतःकरण सध्या ज्या गोष्टींचा, संघर्षांचा सामना सध्या करीत आहे, त्याच्याशी या घटना कशा प्रकारे जुळतात हे कृपा करून मला दाखव.'' तुम्ही सामना करीत असलेली गोष्ट जर ते स्वप्न दाखवत नसेल, आणि तुमच्या अंतःकरणाच सध्या चाललेल्या घडामोडींशी याचा काही संबंध आहे की नाही हे जर तुमचा आध्यात्मिक सल्लागार सांगू शकत नसेल, तर हे स्वप्न तुमच्यासंबंधी नाही असे तुम्ही समजू शकता.

## भविष्याविषयी सांगणारी स्वप्ने

पुष्कळ स्वप्ने भविष्याविषयी सांगत असतात. एखादी व्यक्ती जर पश्चात्ताप करून आपले मार्ग बदलणार नाही, तर नजिकच्या भविष्यकाळात काय घडेल हे काही स्वप्ने दाखवतात. इतर स्वप्ने पवित्र शास्त्रातील काही स्वप्नांप्रमाणे दूरवर भविष्यात काय घडेल हे सांगतात.

## स्वप्नांसंबंधी अधिक चर्चाविचार

१. स्वप्ने ही विश्वसनीय संदेशवाहक आहेत. ती एखाद्या व्यक्तीच्या अंतःकरणाची स्थिती (दानी.२:३०), तसेच त्याच्या अंतःकरणात ऐकू येत असलेली देवाची वाणी (प्रे.कृ.२:१७) प्रगट करतात. तसेच सैतानाकडून किंवा दुष्ट आत्म्यांकडून अंतःकरणावर होणारे हल्ले वेळोवेळी प्रगट करतात. (ज्याची परिणती हताशा आणि मृत्यू यांत होईल अशा प्रकारे सैतान दोषारोप करतो याचे उदाहरण म्हणून ईयोब ४:१२-२१ हा शास्त्रभाग दाखवता येईल. स्वप्नाद्वारे सैतान बोलत असल्याचे पवित्र शास्त्रातील हे एकमेव उदाहरण आहे.) माझ्या स्वतःच्या जीवनात असे एकच स्वप्न होते की ज्याकडे दुर्लक्ष करायला देवाने मला सांगितले कारण ते सैतानी स्वप्न होते. म्हणून पवित्र शास्त्रातील पुरावा आणि माझ्या स्वतःच्या जीवनातील अनुभव यांमुळे बरीचशी स्वप्ने सैतानाकडून किंवा दुष्ट आत्म्यांकडून येतात असे मी म्हणत नाही.

२. पवित्र शास्त्रामध्ये, स्वप्न पाहणारे लोक जागे झाल्यावर स्वप्नानुसार कृती करीत असत. तुम्हीदेखील तुमच्या स्वप्नानुसार कृती करा!

३. तुमच्या स्वतःच्या स्वप्नांचा अर्थ सांगण्याचा किमान ५ वर्षे अनुभव घेतल्याशिवाय तुम्ही स्वतःला दुसऱ्यांच्या स्वप्नांचा अर्थ सांगणारे तज्ज्ञ समजू नका. त्यांना तुम्ही कल्पना आणि सल्ला देऊ शकता, पण आपण तज्ज्ञ आहोत असे भासवू नका.

४. भविष्यसंदेशांप्रमाणे, स्वप्नातील संदेश आणि इशारे हे मनुष्याच्या प्रतिसादावर अवलंबून असतात (यहेज्केल ३३:१३-१६). तुमच्यावर एखादे संकट येऊ नये, म्हणून स्वप्न तुम्हांला एखादी कृती करण्यास किंवा स्वतःमध्ये बदल घडवण्यास सांगते. तुम्ही योग्य प्रकारे प्रतिसाद दिला तर संकट येणार नाही.

५. लैंगिक स्वप्ने लाक्षणिक अर्थाने घेतली पाहिजेत. लैंगिक संबंध (संभोग) हे ऐक्याचे प्रतीक आहे, म्हणून ''माझ्या बाबतीत कोणत्या संदर्भात ऐक्य किंवा एकत्र येणे होणार आहे?'' असा प्रश्न विचारा. तुमच्या स्वतःमधील संघर्षाच्या दोन बाबींचे कदाचित ऐक्य होणार असेल (उदा. स्वतःला खूप कामात गंतुवून ठेवणे आणि आराम करण्याची इच्छा या तुमच्या दोन भावनांचे ऐक्य). किंवा तुमच्या स्वभावात आदरातिथ्याची भावना असावी असे तुम्हांला वाटत असेल तर तुम्ही आणि ज्या व्यक्तीमध्ये आदरातिथ्याचे गुण आहेत तिच्यामध्ये लैंगिक संबंध आल्याचे स्वप्न तुम्हांला पडू शकेल.

६. एखादे स्वप्न पहिल्यांदा पडल्यावर जर तुम्ही त्याच्यातील संदेश ऐकला नाही किंवा त्याप्रमाणे कृती

केली नाही, तर ती स्वप्ने पुनःपुन्हा पडतात.

७. रात्री पडणारी भीतीदायक स्वप्ने ही आरोग्य न मिळालेल्या अंतःकरणाचा आक्रोश असतात. तुम्हांला आंतरिक आरोग्य मिळावे, आणि तुमच्यामधील ज्या ज्या गोष्टींना सुटकेची गरज आहे त्यांसाठी ती तुम्हांला प्रार्थना करायला सांगतात. माझ्या स्वतःच्या जीवनात सुमारे १५ वर्षे एक स्वप्न मला छळत होते. पण ती भीती दाखवणाऱ्या दुष्ट आत्म्याला जेव्हा माझ्यामधून काढून टाकले गेले तेव्हा ते स्वप्नही नाहीसे झाले.

८. जे सर्वांत नैसर्गिक वाटणारे स्पष्टीकरण आहे, तेच बहुधा बरोबर असते.

९. एकाच रात्री बरीच पडणारी स्वप्ने ही एकाच समस्येचे वेगवेगळे पैलू आणि त्यावरील उपाय दाखवत असतात.

१०. स्वप्ने ही स्वप्ने पाहणाऱ्याला कृती करण्यास प्रवृत्त करतात.

११. तुम्ही स्वप्नाचे विवरण करू लागता तेव्हा स्वप्नाविषयी तुम्हांला काही माहीत नाही हे लक्षात घ्या. स्वप्नाचा अर्थ काय हे त्या स्वप्नाने आणि स्वप्न पाहणाऱ्याच्या अंतःकरणाने तुम्हांला सांगितले पाहिजे.

१२. निरनिराळे सिद्धान्त विकसित करणे, भावनांना हात घालणे, आणि एखाद्याची इच्छा नियंत्रित करणे यांद्वारे धर्म देवाकडे जाण्याचा प्रयत्न करतो. पण देव त्याचा आवाज, भविष्यसंदेश, स्वप्न, दृष्टान्त आणि अभिषेक यांद्वारे मनुष्याच्या अंतःकरणात आणि आत्म्यात सरळ प्रवेश करतो.

१३. स्वप्ने ही दैवी सर्जनशीलता प्रकट करतात. पुष्कळ शोध स्वप्नाद्वारे लागले आहेत. शिवणयंत्रामधील सुईचे हूक कुठे असावे याचे आकलन स्वप्नाद्वारे झाले. बेंझिनच्या गोलाकार रचनेचा शोध स्वप्नात लागला. अशा हजारो उदाहरणांपैकी केवळ दोन उदाहरणे मी येथे दिली आहेत.

## स्वप्ने आणि दृष्टान्त यांविषयी इशारे?

१. तुमच्या स्वप्नांविषयी सावध राहा असे इशारे पवित्र शास्त्रात आढळत नाहीत. उपदेशक ५:३, ७ हे मात्र याला अपवाद असू शकेल. पण येथे दिवासप्न पाहण्याविषयी सांगितले आहे. पवित्र शास्त्रातील इतर स्वप्ने मात्र सकारात्मक आहेत. जेव्हा एखादे वचन इतर अनेक वचनांशी विरोधाभास दाखवते, तेव्हा त्या विषयावर इतर वचने, इतर शास्त्रभाग काय सांगतात त्याच्या आधारे ते वचन समजून घेतले पाहिजे.

२. तुम्ही जेव्हा **दुसऱ्यांची** स्वप्ने ऐकता तेव्हाच मात्र पवित्र शास्त्रात सावधानतेचा इशारा दिला आहे. ती स्वप्ने तुम्हांला कदाचित देवापासून दूर बहकवतील (यिर्मया १४:१४; २३:१६, २५-२७, ३२; यहेज्केल १३:१,७; १२:२४; अनुवाद १३:१-५; यिर्मया २७:९-११; जखऱ्या १०:२).

## गटांमध्ये स्वप्नांचा अर्थ सांगण्याचे नियम

१. गटामधील सभासदांना त्यांच्या उशाशी वही ठेवण्यास सांगा. देवाने स्वप्न दाखवावे म्हणून त्यांना विनंती करायला आणि स्वप्न पडले तर जागे झाल्याव लगेच ते वहीत लिहून ठेवायला त्यांना सांगा. वर्गात नेहमी अलीकडे किंवा नुकत्याच पडलेल्या स्वप्नांची चर्चा करावी, कारण स्वप्न पाहणारी व्यक्ती झोपी गेली तेव्हा तिच्या मनात कोणते प्रश्न, कोणत्या समस्या होत्या इ. गोष्टी तिच्या चांगल्या लक्षात असतात. तसेच गटांमध्ये स्वप्नांचा विचार करताना मोठ्या, लांबलचक स्वप्नांविषयी विचार न करता छोट्या स्वप्नांचा विचार करणे श्रेयस्कर ठरते.

२. गटांमध्ये स्वप्नांचा अर्थ सांगत असताना, स्वप्न पाहणाऱ्याला जेवढे खोल जायची इच्छा आहे, त्यापेक्षा जास्त खोलात शिरू नका. कारण स्वप्नांचा अर्थ सांगितला जात असताना, ज्या गोष्टींची इतरांसमोर चर्चा केली जाऊ नये असे स्वप्न पाहणाऱ्याला वाटेल अशा गोष्टी पुढे येत असल्याचे त्याच्या किंवा तिच्या लक्षात येईल. म्हणून ‘‘मला स्वप्नाचा अर्थ इतकाच समजून घ्यायचा होता, आता पुढे सांगू नका,’’ असे

म्हणण्याचा अधिकार स्वप्न पाहणाऱ्याकडे नेहमीच असतो.

### गटामध्ये स्वप्नांचा अर्थ सांगण्याची पद्धत

१. गटपुढाऱ्याने चर्चेचे नेतृत्व करावे आणि पुढील पद्धतींचा अवलंब करून दोन किंवा तीन स्वप्नांचा अर्थ सांगावा :

**मन उघड करणारे कळीचे प्रश्न विचारण्याची पद्धत** (स्वतः शोध घेण्यासाठी मार्गदर्शन)

अ) फळ्यावर उजवीकडच्या वरच्या कोपऱ्यात स्वप्न पाहणाऱ्याचे नाव लिहा, जेणेकरून प्रत्येक जण त्याचे किंवा तिचे नाव घेऊन बोलू शकेल. स्वप्न पाहणाऱ्या व्यक्तीला गटांतील लोकांच्या प्रश्नांची उत्तरे देता यावीत म्हणून त्याला किंवा तिला वर्गात समोर उभे करा किंवा बसवा.

ब) स्वप्न पाहणारी व्यक्ती आपले स्वप्न दोनदा मोठ्याने वाचून दाखवते. स्वप्न वाचून दाखवले जात असताना, एखादी व्यक्ती त्यातील महत्त्वाच्या घटना आणि घटक फळ्यावर लिहिते. फळा उपलब्ध नसेल, तर गटातील प्रत्येक सभासदाने स्वतःच्या संदर्भासाठी वहीत किंवा कागदावर मुद्दे लिहून काढावेत.

क) स्वप्न पाहणाऱ्याला विचारा :

- ‘‘स्वप्नामधील मुख्य भावना काय होती?’’
- ‘‘स्वप्नामधील मुख्य कृती काय होती?’’
- ‘‘तुमच्या जीवनातील कोणत्या बाबीत तुम्हांला याचा अनुभव येत आहे?’’
- स्वप्नाची पार्श्वभूमी काय आहे, आणि साधारणतः कोणत्या प्रश्नांचा उहापोह करायचा हे यावरून स्वप्न पाहणाऱ्याच्या आणि गटाच्या लक्षात येईल. फळ्यावर मुख्य भावना आणि मुख्य कृती असे दोन भाग करा आणि वरील प्रश्नांची उत्तरे त्या त्या भागात लिहा.

ड) स्वप्नातील पहिल्या घटनेपासून सुरुवात करून श्रोते पुढीलप्रमाणे प्रश्न विचारू शकतात :

- या व्यक्तीचे महत्त्वाचे किंवा मुख्य गुणवैशिष्ट्य काय आहे?
- त्या प्राण्याद्वारे तुमची कोणती भावना व्यक्त केली जाते?
- तुमच्या जीवनात सध्या या गोष्टीचा (स्वप्नात दिसलेली गोष्ट/घटना) अनुभव कशा प्रकारे घेत आहात?

इ) स्वप्न पाहणाऱ्या व्यक्तीला वरीलपैकी एखाद्या प्रश्नाचे उत्तर देता आले नाही तर :

त्या व्यक्तीला तणावमुक्त होण्यास सांगा. मनातील विचारशृंखलेचे पृथक्करण करण्याच्या भानगडीत न पडता विचारांचा प्रवाह तसाच खुलेपणाने वाहू देण्यास सांगा.

स्वप्नातील गोष्टींचा अर्थ काय असावा याविषयी गटाला निरनिराळे पर्याय सुचवण्यास सांगा. हे सर्व पर्याय फळ्यावर लिहून काढावेत.

स्वप्न पाहणाऱ्याने मग फळ्याजवळ यावे व त्यातील ज्या गोष्टी त्याच्या अंतःकरणाशी जुळत नाहीत, त्यांवर काट मारावी, आणि ज्या सुसंगत आहेत, ज्यांद्वारे देव त्याला काही अर्थविवरण करीत असेल त्यांच्याभोवती गोल करावा.

२. गटाची चारचार किंवा सहासहामध्ये विभागणी करावी आणि मग त्यांच्या गटातील व्यक्तींच्या स्वप्नांविषयी त्यांना दोन ते तीन तास चर्चा करू द्या. वर ‘‘गटामध्ये स्वप्नाच्या अर्थविवरणाचे नियम’’ दिले आहेत त्यानुसार त्यांनी चर्चा करावी. त्यांना ‘‘महत्त्वाचे प्रश्न विचारण्याची पद्धत’’ अवलंबण्यास सांगा. त्यांना जर मदतीची गरज असेल तर वर्गपुढाऱ्याने येऊन त्यांना मदत करावी म्हणून त्याचे लक्ष वेधून घेण्यासाठी त्यांनी हात वर करावे,

वर्गाचा/चर्चासत्राचा पुढारी जर एखाद्या गटाला मदत करण्यात व्यग्र नसेल तर त्याने आळीपाळीने प्रत्येक गटाला भेट द्यावी आणि सर्व काही सुरळीत चालले

आहे की नाही हे पाहावे.

## स्वप्नाचा अर्थ सांगण्याची उदाहरणे

देवाची वाणी कशी ऐकावी, देवाचा दृष्टान्त कसा पाहावा, आणि त्याची नोंद कशी करावी हे मी ज्या दिवशी शिकलो त्या रात्री मला दोन स्वप्ने पडली. माझ्या उशीजवळ मी वही ठेवली आणि देवाने माझ्याशी बोलावे अशी विनंती केल्यावर त्या रात्री मला बरीच स्वप्ने पडली.

### स्वप्न # १

घराचा काळजीवाहक म्हणून मला नवीन काम मिळाले. ज्या घरात खूप पायऱ्या आहेत अशा घरात मी होतो. एका घोड्यावर बसून मी पायऱ्या चढत होतो. वर मी एका बाथरूममध्ये गेलो आणि तेथून स्वच्छतेच्या काही वस्तू मी घेतल्या.

### अर्थविवरण

**प्रश्न** : ''मला कोणत्या प्रकारे नवीन काम मिळाले?''
**उत्तर** : ''आजच मी देवाची वाणी ऐकायला, दृष्टान्त पाहायला आणि ते लिहून ठेवायला सुरुवात केली.''

**प्रश्न** : ''मी घोड्यावर बसून पायऱ्या चढत आहे असे मला का वाटते?''
**उत्तर** : ''देवाच्या आत्म्याशी सुसंगत होणे, त्याचे दृष्टान्त पाहणे, आणि त्यांची नोंद करणे यांविषयी मला अवघडल्यासारखे वाटते. अशा प्रकारचे जीवन जगण्यासाठी मला सराव करावा लागेल. पण आता या क्षणी मात्र माझी अवस्था चिनी मातीच्या कपाटात कोंडलेल्या बैलासारखी झाली आहे.''

**प्रश्न** : ''या पायऱ्या मला वर कशा प्रकारे नेतील?''
**उत्तर** : ''मी देवासोबत वाटचाल करीत असताना, त्याची वाणी ऐकणे, त्याचे दृष्टान्त पाहणे आणि त्यांची नोंद करून ठेवणे यांद्वारे मी त्याच्या सहभागिते अधिकाधिक वाढेन.''

**प्रश्न** : ''स्वच्छता करण्याचे सामान मी कशा प्रकारे घेईन?''
**उत्तर** : ''देवाची वाणी ऐकण्यामुळे माझ्या जीवनातील काही क्षेत्रे स्वच्छ केली जातील.''

### स्वप्न # २

ज्या रात्री मला वरील स्वप्न पडले, त्याच दिवशी मला दुसरे स्वप्न पडले. त्यात मी माझी कार पार्किंगच्या जागेत उभी करून इंजिन बंद केले, पण काही केल्या इंजिन बंद होईना. ते सुरूच राहिले.

### अर्थविवरण

**प्रश्न** : ''मी अशी कोणती गोष्ट बंद करण्याचा प्रयत्न करीत आहे, जी बंदच होत नाही?''
**उत्तर** : ''तर्कशुद्ध विचार करणारा माझा मेंदू. मी देवाशी ट्यूनअप व्हावे आणि त्याची वाणी ऐकावी म्हणून.''

याचा अर्थ असा की, वरील दोन स्वप्ने ही माझ्यामधील समस्यांविषयी बोलत आहेत आणि मला मार्गदर्शन करून उत्तेजन देत आहेत. ती म्हणतात, ''माझ्या जीवनातील या नवीन दिशेबाबत (देवाची वाणी ऐकणे, दृष्टान्त पाहणे आणि ते लिहून काढणे) जरी मी अवघडल्यासारखा झालो आहे, तरी मी त्या दिशेने जात राहीन. आणि माझ्या जीवनात आजपर्यंत जिचा पगडा होता, आणि जी गोष्ट कित्येक वर्षांपासून मला देवाच्या ठिकाणी होती, ती तार्किक विचारशैली बंद करण्यासाठी मला झगडावे लागेल.''

* * *

**माईक बेस्तीनचे स्वप्न** : ''देवाशी सुसंवाद'' या शिबिरात अलीकडेच सुमारे ३५ पाळकांना शिकवण्याचा मान मला मिळाला. टोरान्टो एअरपोर्ट ख्रिश्चन फेलोशिप येथे आठवडाभराच्या प्रशिक्षणासाठी ते आले होते. आठवड्याच्या अखेरीस रेव्ह. माईक बेस्टीन यांनी तक्रार केली की, ''तुम्ही खूप भरभर शिकवत असल्याने पुष्कळ गोष्टी मला समजत नाहीत.'' त्यावर मी म्हटले, ''काही हरकत नाही. **देवाशी सुसंवाद** हे पुस्तक, कॅसेट्स आणि व्हिडिओज तुम्ही घरी घेऊन जाऊन तुमच्या फावल्या वेळेनुसार त्यांचा अभ्यास करू शकता.'' घरी गेल्यावर एक किंवा दोन दिवसांनी माईकने मला ईमेल पाठवले. त्यात त्याने त्याला पडलेले स्वप्न सांगितले. या स्वप्नामुळे तो व्यथित झाला होता. त्यानंतर आमच्यात ईमेलद्वारे जो पत्रव्यवहार झाला तो त्याच्या परवानगीने मी सादर करीत आहे.

**माईकने मला पाठवलेला स्वप्नवृत्तान्त** : ‘‘मी हायस्कूलमध्ये होतो तेव्हा शाळेची बस माझ्या घराकडे येत असे. मला उशीर झाला होता, बस येताना पाहून मी तिच्याकडे धावत निघालो. एवढ्यात माझ्या अगोदर माझे सासरे (फ्रेड) बसमध्ये चढल्याचे मी पाहिले. मी बसजवळ पोहोचतो न पोहोचतो तोच बस निघून गेली. मला न घेतला बस गेली म्हणून मी खट्टू झालो. जॉर्जच बस चालवत आहे की नाही हे पाहण्याचा मी प्रयत्न केला. तोच ड्रायव्हिंग करीत असावा असे मला वाटले. (मी शाळेत असताना जॉर्जच बस चालवीत असे).

‘‘पण लवकरच दुसरी शाळेची बस येताना मला दिसली. मला जायचे होते त्याच रस्त्यावरील दुसऱ्या शाळेत जाणारी ती बस होती. तिच्यातील महिलेला विचारून मी बसमध्ये बसलो. नंतर जॉर्ज मला घ्यायला का थांबला नाही असे माझ्या सासऱ्यांशी मी बोलत होतो हे मला आठवते. त्यांनी तोंडातल्या तोंडात पुटपुटत काही तरी उत्तर दिले. ते उत्तर तसे अर्थहीनच होते, आणि आता मला ते आठवतही नाही.

‘‘बस, एवढेच माझे स्वप्न होते. पण एक गोष्ट मला खटकते ती म्हणजे माझे सासरे गेल्या डिसेंबरमध्ये वयाच्या ६१ व्या वर्षी कॅन्सरने वारले.’’

**माझे पहिले उत्तर** : ‘‘तुम्ही विचार करावा म्हणून मी काही प्रश्न आणि पर्याय सुचवत आहे.’’

स्वप्नातील प्रतीके पुढीलप्रमाणे आहेत :

- शाळा = आपण जेथे शिकतो ते ठिकाण
- बस = शिकण्याच्या ठिकाणी नेणारी वाहतूकव्यवस्था
- मागे राहणे = मागे राहण्याची भीती

‘‘यावरून तुम्ही स्वतःला पुढील प्रश्न विचारा, ‘‘माझ्या जीवनातील या समयी मी असे काय शिकत आहे की, ज्यात मागे राहण्याची भीती मला सतावत आहे?’’

‘‘मला असे वाटते की तुमचे उत्तर असे असावे : देवाशी संभाषण करण्याच्या बाबतीत तुम्ही सध्या शिकत आहात, आणि आपण यात मागे पडू (ते सर्व आपल्याला समजणार नाही) अशी तुम्हांला भीती वाटत आहे. आणि तुमची ही भीती तुम्ही वर्गात सांगितलीही होती. मला असे वाटते की, तुमची ही भीती तुमच्या स्वप्नात व्यक्त झाली आहे.

‘‘पण अजूनही आशा आहे हे देवाने तुम्हांला दाखवले आहे. दुसरी बस आली आणि तिच्यात बसून तुम्ही शाळेला गेला. शिक्षणाचा एखादा भाग प्रथम समजला नाही म्हणून घाबरून जाण्याची गरज नाही. ते समजून घेण्याचा दुसरा मार्ग आहे. उदा. ***देवाशी संभाषण*** हे पुस्तक पूर्णपणे वाचणे, ख्रिश्चन लीडरशिप युनिव्हर्सिटीमधून कम्युनियन विथ गॉड हा तीन महिन्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करणे; तयार केलेल्या व्हिडिओज विकत घेणे; या संपूर्ण अभ्यासक्रमाच्या माझ्या कॅसेट्स विकत घेणे; सीडब्ल्यूजी शिक्षकांचे पुस्तक विकत घेणे; तुमच्या मंडळीतील किंवा विभागातील पुढाऱ्यांकडून आध्यात्मिक मार्गदर्शन घेणे इ.

तुमच्या स्वप्नातील व्यक्ती एक वर्षापूर्वी मेली याची चिंता करीत बसू नका. आपल्या स्वप्नात येणाऱ्या व्यक्ती बहुतेक वेळा आपल्याच भाग (आपणच) असतात. आपला कोणता भाग स्वप्नात आला आहे हे समजून घेण्यासाठी ‘‘या व्यक्तीची ठळक किंवा अधिकार गाजवणारी गुणलक्षणे कोणती आहेत?’’ हा प्रश्न विचारावा. म्हणजे मग आपण ज्याविषयी स्वप्न पाहतो तो आपल्या व्यक्तीमत्त्वाचा भाग स्पष्ट होतो. हे स्वप्न तुमच्या मरणाशी संबंधित नाही.’’

**माईकचे दुसरे पत्र** : ‘‘मार्क, उत्तर दिल्याबद्दल मी तुमचा आभारी आहे. प्रामाणिकपणे सांगायचे तर मी याची अपेक्षा केली नव्हती. तसे तुमचे स्पष्टीकरण चांगले वाटते, पण माझ्यासमोर मोठा प्रश्न आहे... माझे सासरेच माझ्या स्वप्नात का आले, आणि स्वप्नात तेच आहेत हे इतके स्पष्ट का दिसले? त्यांचा या स्वप्नाशी काय संबंध असावा?’’

**माझे दुसरे उत्तर** : ‘‘तुम्ही तुमचे सासरे फ्रेड यांचा विचार करता तेव्हा त्यांची कोणती ठळक गुणवैशिष्ट्ये तुम्हांला आठवतात? हीच तुमच्या प्रश्नाची गुरुकिल्ली आहे. ते वैशिष्ट्य तुमच्या लक्षात आले की, तुमच्या कोणत्या गुणलक्षणाविषयी हे स्वप्न बोलत आहे ते तुमच्या लक्षात येईल. योग्य तो संदेश तुम्हांला मिळावा म्हणून तुमचे अंतःकरण चित्रे काढत आहे.

‘‘तुमचे जे गुणलक्षण फ्रेड दाखवीत आहे, त्या तुमच्या भागाचा देवाशी सुसंवाद आहे, पण दुसरा कोणता तरी भाग त्याबाबती झगडत आहे. त्यामुळे आपण मागे पडू की काय अशी भीती तुम्हांला वाटत आहे.

‘‘फ्रेड हे डोक्याऐवजी अंतःकरणाने विचार करणारे गृहस्थ होते का?

‘‘माझा अंदाज आहे की, तुमचे अंतःकरण देवाच्या संदेशाशी सुसंगत आहे, पण तुमच्या डाव्या मेंदूला मात्र भीती वाटते की, आपल्याला सर्व काही बरोबर समजलेले नाही. पण मी पूर्वी सांगितल्यानुसार चार दिवस मी जे काही शिकवले ते सर्व तुमच्या मेंदूला लगेचच समजलेच पाहिजे असे नाही, कारण तुम्ही घरी जाऊन अभ्यास करावा म्हणून मी तुम्हांला पुस्तके, कॅसेट्स इ. साहित्य दिले आहे.

‘‘मला असे वाटते की, तुमच्या मेंदूचा डावा भाग गोंधळात पडला आहे, पण तुमचे अंतःकरण मात्र देवाशी सुसंवाद या संदेशाशी सुसंगत असे आहे.

‘‘तुम्हांला काय वाटते?’’

**माईकचे अखेरचे उत्तर :** ‘‘मार्क, फारच छान! माझे सासरे अगदी तसेच होते. धन्यवाद.’’

* * *

एका सहकाऱ्याच्या स्वप्नाचा अर्थ सांगण्याचे दुसरे उदाहरण - माझ्या लिखाणाचे संपादन करणारी आणि माझ्याकडून बायबल शिकणारी महिला एकदा पुढील स्वप्न सांगत माझ्याकडे आली.

स्वप्नात ती तिच्या घरात गेली तेव्हा तिला धुराचा वास आहा. आग कोठे लागली हे पाहायला ती माडीवर गेली, पण तेथे आग नव्हती. मग ती किचनमध्ये गेली, तर तेथे जास्तच वास होता. तिने किचनमधील वरची कपाटे उघडली पण तेथेही आग नव्हती. तिने खालची कपाटे उघडल्याबरोबर ज्वाला बाहेर उफाळल्या आणि ती जागी झाली.

या स्वप्नाचा अर्थ काय असावा हे आम्हांला त्या वेळी समजले नाही. दोन महिन्यांनी ती पोटात दुखते म्हणून डॉक्टरकडे गेली. ताणतणावाशी संबंधित असा आतड्यांच्या जळजळीचा विकार तिला झाल्याचे निदान झाले. डॉक्टरांनी औषधोपचार सुरू केले आणि ती बरी झाली.

दोन महिन्यानंतर ज्या विकाराचे निदान होणार होते त्याची पूर्वसूचना तिच्या स्वप्नाने तिला दिली हे तुमच्या लक्षात आले का?

तिच्या घरात आग लागली असे तिचे स्वप्न तिला सांगत होते. तिचे घर म्हणजे तिचे शरीर.

आग स्वयपाकघरात लागली होती. स्वयपाकघर म्हणजे जेथे आपण जेवतो ती जागा. आणि अशा प्रकारे तिची आतडी सुचवली गेली.

आग वरच्या कपाटात नव्हती. हे कपाट म्हणजे तिच्या पचनसंस्थेच्या वरच्या भागाचे दर्शक होते.

आग खालच्या कपाटात होती. म्हणजे तिच्या पचनसंस्थेच्या खालच्या भागाचे, आतड्याचे हे दर्शक होते.

एक वर्षानंतर हे स्वप्न पुन्हा पडले. तिच्या लगेच लक्षात आले की, आता जर आपण आराम केला नाही, चिंता करणे सोडून दिले नाही तर पुन्हा आपल्याला डॉक्टरकडे जावे लागेल. तिने आराम केला, चिंता सोडून दिली, परिणामी तिला आजार झाला नाही. हे फारच चांगले मार्गदर्शन होते, ते ऐकून त्यानुसार करणे अगत्याचे होते. मनुष्याच्या आत घडणाऱ्या गोष्टी सांगणारे हे स्वप्न होते. तिने आपले मार्ग बदलले नाहीत तर येणाऱ्या संकटाची पूर्वसूचना देणारे ते स्वप्न होते.